+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम योजनेनुसार अभ्यासक्रम बदलून मिळणेबाबत. (जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, लातूर)

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांकः व्हीओसी-२०१७/प्र.क्र. ६२/व्यशि-४,

मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०४ डिसेंबर, २०१७.

संदर्भ :

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२००८/(११६/०८)/व्यशि-३, दिनांक २/३/२००९
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०१४/१२८/प्र. क्र.३५/व्यशि-४, दिनांक २७/३/२०१४
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक :व्हिओसी-२०१५/प्र. क्र. १०९/व्यशि-४, दि. ४/७/२०१५
४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ४/व्हीओसी/२०१६-१७/३८, दिनांक ३/४/२०१७.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या १९८६ च्या नविन शैक्षणिक धोरणानुसार +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण देवून जास्तीत जास्त युवकांना रोजगार/स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहित करण्याच्या दृष्टिने राज्यात १९८८-८९ पासून ७०% व्यवसाय शिक्षण व ३०% सामान्य शिक्षण अंतर्भूत असलेले किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात आले, हे अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाभिमुख असल्याने विद्यार्थ्यांना संबंधित व्यवसायाशी निगडीत किमान कौशल्य प्राप्त करुन स्वत:चा उद्योग सुरु करावा अथवा औद्योगिक आस्थापनामध्ये नोकरी करावी आणि उच्च शिक्षणाकडे जाणारा लोंढा कमी व्हावा हा या योजनेचा उद्देश आहे. या अभ्यासक्रमाचे किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम हे नाव संदर्भांकित अनु क्र.१ च्या शासन निर्णयान्वये बदलण्यात आले असून ते उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एच. एस. सी. व्होकेशनल) असे करण्यात आले आहे. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम ६ गटामध्ये विभागण्यात आले असून सद्य:स्थितीत एकूण ३० अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत.

सदर अभ्यासक्रमांची औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार व आधुनिक उच्च तंत्रज्ञानावर आधारित पुनर्रचना करण्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे राज्यस्तरीय बैठकीत चर्चा करुन ठरविण्यात आले. त्यास अनुसरुन +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम योजनेतील सत्र २०१४-१५ मध्ये सुरु असलेले जुने ३० व्यवसाय अभ्यासक्रम रुपांतरित नविन २० अभ्यासक्रमात करण्याचे उक्त संदर्भित शासन निर्णय दि. २७/३/२०१४ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाची योजना राबविणा-या शासकीय

अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थामध्ये जुने अभ्यासक्रम नविन अभ्यासक्रमामध्ये रुपांतरित करुन प्रवेश सत्र २०१५-१६ पासून नविन पाठयक्रमाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. आता संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी वरील संदर्भ क्र. ४ अन्वये जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, लातूर या संस्थेतील बॅकिंग व इश्युरन्स या दोन जुन्या अभ्यासक्रमाऐवजी शैक्षणिक सत्र २०१७-१८ पासून नविन शासन निर्णयानुसार बँकींग, फायनान्शिअल सर्व्हीस ॲण्ड इन्शुरन्स (१ तुकडी) व अकौंटींग फायनान्शियल ऑफिस मॅनेजमेंट (१ तुकडी) असा बदल करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन आता याव्दारे, जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, लातूर या संस्थेस बॅकिंग व इश्युरन्स या दोन जुन्या अभ्यासक्रमाऐवजी शैक्षणिक सत्र २०१७-१८ पासून नविन शासन निर्णयानुसार बँकींग, फायनान्शिअल सर्व्हीस ॲण्ड इन्शुरन्स (१ तुकडी) व अकौंटींग फायनान्शियल ऑफिस मॅनेजमेंट (१ तुकडी) असा बदल करण्यास मान्यता देत आहे.

२. सदर नविन अभ्यासक्रमाप्रमाणे सुधारित पाठयपुस्तके व आवश्यक बाबी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्तरावरुन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१७१२०४१५३५११७७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2017.12.04 15:40:15 +05'30'

(स. दि. खरात)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१
२) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
३) शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग), औरंगाबाद (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)
४) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
५) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
६) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक.
७) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.

८) उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

९) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद (संचालनालयामार्फत.)

१०) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (संचालनालयामार्फत.)

११) जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय, लातूर

१२) निवड नस्ती (व्यशि-४).